बा.वा.
२४६५
७/७/८/९०

म. पं. बं. भावे, वाचनालय, ठाणे.
बाल वाङ्मय विभाग.
ना. क्र. २४६५ दिनांक ७.७.८।९०
विषय ...बा.वा.... क्र. ...........

BVBK-0402465

# निवडक बालकथा
## भाग १

दत्तू गोरे

किंमत १२ रुपये



BVBK-0402465

अंजनी प्रकाशन
पुणे ३७

प्रकाशिका / मुद्रक : सौ. अंजना अनंत बुरटे
अंजनी प्रकाशन,
बी १६/८ इंदिरानगर (लोअर)
बिबवेवाडी, पुणे ४११०३७

प्रकाशन क्र ४

प्रथमावृत्ती : १९९०

मुद्रणस्थळ : प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.


© प्रकाशकाकडे



बालमित्रांनो,

मुलांचे मासिक', 'रविवार सकाळ',
'अपूर्व' इत्यादी नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या
ना या निवडक बालकथा
ग १ व २) पुस्तक स्वरूपात
थदून तुमच्यापुढे ठेवण्यास मला आनंद वाटतो.
नवडक बालकथा
जनी प्रकाशन ही नवोदित प्रकाशन संस्थाच
काशित करण्याचे साहस करीत आहे.
याबद्दल अंजनी प्रकाशनचे साभार स्वागत केले पाहिजे.
याचप्रमाणे अंजनी प्रकाशनच्या
या उपक्रमास शुभेच्छा द्यावयास हव्यातच.

दत्तू गोरे



## कथानुक्रम


मायभूमीसाठी / ६

राजा कसा असावा / १०

परीक्षा / १९


तडजोड / २२

देव तारी त्याला....! / २९

विनोबांची शिवजयंती / ३६

अजब अंगरखा / ४०

गुपित / ४६

थोर बालसन्मित्रास–

*सादर समर्पण*



# मायभूमीसाठी

आपली आई जितकी थोर तेवढाच देवसुद्धा थोर! पण त्या थोर देवाला आईच नाही. तो आईविना भिकारीच की! त्यातल्या त्यात आई इतका देव आणि आपली मायभूमी व आपला देश किती महान. देव सर्व ठिकाणीच आहे. तो आईरूप आहे तसा तो देशरूपही आहे!

आपण आपल्या मातृभूमीसाठी काय करू शकणार नाही? आई आणि देव याचप्रमाणे मायभूमी पवित्र-थोर. तिची भक्ती, तिची निष्ठा, तिच्यावरील प्रेमाने व अभिमानाने भारावलेली माणसे काही कमी नाहीत. तिच्या संरक्षणासाठी जो सर्वस्वाचे बलिदान करायला मागे-पुढे पाहत नाही, तोच खरा तिचा एक सुपुत्र! आणि मायभूमी हीच त्याची माता होय!

कोरिया देशातील लहान मुलांची अशी ही एक गोष्ट. हा कोरिया देश पूर्वेकडील अनेक देशांपैकी एक. याची राजधानी सेऊल. तेथील लोक कोरियन लोक होत. जसे चीनमधील चिनी, भारतातील भारतीय, तसे! ते परकी देशातील भारतीयांना इंडियन असे म्हणून ओळखतात.

कोरिया देशाची आता ही हकीकत पाहू या. त्याच्या सेऊल या राजधानीतील एका शाळेतील गोष्ट. त्या शाळेत एकदा मोठी सभा भरली होती. काही श्रीमंत जपानी लोकांनी या शाळेला भेट दिली आणि त्या शाळेतील मुलांच्यासमोर भाषणे दिली. नंतर त्या पाहुण्यांचा त्या शाळेतील शिक्षकांनी हार-तुरे देऊन गौरव केला. कोरिया देश जपान या देशाने जिंकून तो आपल्या अमलाखाली



आणला होता. आपला देश परकीय लोकांच्या ताब्यात गेला, जपान्यांनी त्याच्यावर राज्य करायला सुरवात केली, हे त्या कोरियन जनतेला पसंत पडले नाही. मोठ्या लोकांना ही गोष्ट जशी

आवडली नाही, तशी तेथील काही मुलांनाही आवडली नाही.


शाळेतील समारंभ संपताच, एक अवघा तेरा वर्षांचा मुलगा उभा राहिला आणि आदराने आपले डोके जरा लववून आपला हात छातीशी धरला. त्या मुलाचा हात छातीशी जाताच इतर साऱ्या मुलांचे हात छातीजवळ गेलेले दिसले. जपानी पाहुण्यांना वाटले, या मुलांनी आपल्या खिशातून पिस्तुले काढली असावीत, सुऱ्या आणल्या असाव्यात किंवा बॉम्ब तरी आणलेले असावेत. पण त्यातील काहीच त्यांना दिसून आले नाही. एक निराळाच प्रकार त्यांच्या नजरेला आला. त्या प्रथम उभ्या राहिलेल्या मुलाने खिशातून एक राष्ट्रध्वज पट्कन बाहेर काढला. मग त्या राष्ट्रीय झेंड्याला वंदन केले. "आमचा देश-आमची मातृभूमी स्वतंत्र होवो. अमर राहो आमची कोरिया-मायभूमी!" त्याच्या त्या गर्जनेबरोबर शाळेतील साऱ्या मुलांनी आपल्या खिशातून छोटी छोटी निशाणे बाहेर काढली व ती सारी मुले मातृभूमीचा जयजयकार करीत बाहेर पडली.

शाळेतील त्या झालेल्या समारंभानंतर मिठाई वाटली जाणार होती. पण ती मिठाई जागच्या जागी राहिली. त्या बाहेर पडलेल्या मुलांनी त्यांना मिळालेली जपानी सर्टिफिकेटे फाडून टाकली, त्यांचे तुकडे तुकडे करून टाकले आणि रस्त्यावर फेकून दिले. आणि सारेजण मायभूमीचा जयजयकार करीत मिरवणुकीने निघाले. मुले व मुली मिळून निघालेली ती मिरवणूक आपल्या देशाचा जयजयकार करीत चालली होती. या मुलांना माहिती होते की, आपण जे आज काही केले, त्याचे बक्षीस काही मिळणार नाही- पण जपानी अधिकारी- पाहुणे आपले डोके धडापासून

वेगळे केल्याशिवाय राहणार नाहीत. आणि झालेही तसेच! जपानी शिपाई त्या मुलांवर नागव्या तलवारी घेऊन तुटून पडले. कित्येक मुले तर घायाळ होऊन पडली. आणि अनेक मुलांना कैद करण्यात आले. या मुलांच्या मिरवणुकीनंतर कोरिया देशात बंडाची आग भडकली.


"अमर राहो आमची मायभूमी. अमर राहो आमुचा देश-कोरिया!" अशा घोषणेने वातावरण भारून गेले. असे असते देश-प्रेम. अशी असतात मातृभूमीसाठी प्राणार्पण करणारी लहान मुले!





# राजा कसा असावा?

एकदा भोजराजाच्या दरबारात राजानेच एक समस्या दरबारी मंडळींपुढे ठेवली. दरबारात कालिदासासारखे पंडित होते. मंत्री, सरदार आपापल्या जागेवर स्थानापन्न झालेलेच होते. राजा सर्वांना उद्देशून समस्येच्याबाबत बोलू लागला.



तो म्हणाला, "पंडितवर्य आणि मंत्रिगणांनो-सहकाऱ्यांनो, माझ्या समस्येवर नीट लक्ष ठेवून उत्तर शोधा. त्यात माझ्या दोन अटी आहेत. त्याही लक्षात ठेवा. पहिली अट - माझ्या प्रश्नाचे उत्तर तीन दिवसांत द्यावे. आणि दुसरी अट ही की, प्रश्नाचे उत्तर 'न बोलता' द्यावयाचे आहे. माझा प्रश्न आहे- 'मी कसे असायला हवे?'... म्हणजेच राजाने कसे असावे?"

साऱ्या जनांनी होकार दिला आणि मग राजाने सभा बरखास्त केली. सारेजण दरबारातून बाहेर पडले.

पुन्हा तीन दिवसांनी भोजराजाचा दरबार भरला. सारे मंत्री, सरदार, पंडित वगैरे आपापल्या दर्जाप्रमाणे स्थानापन्न झाले.

आपल्या प्रश्नांची उत्तरे चार जणांनी चार थाळ्यात झाकून आणलेली पाहून भोजराजा जरा आश्चर्यचकित झाला. त्यांत एक थाळी कवी कालिदासाची होती. सर्वांवर एकवार नजर फिरवीत भोजराजाने दरबारातील सर्वांचे सहर्ष स्वागत केले. "आज सर्वांनी ही काय विशेष भेट आणली आहे?" राजाने प्रश्न केला.

त्यावर कालिदास पुढे होऊन म्हणाला, "महाराज , आपल्या प्रश्नाचे उत्तर 'न बोलता' द्यावयाचे आहे म्हणून या थाळ्यांतून समस्येची उत्तरे आपणास देण्यात आली आहेत. ती वस्त्र टाकून मुद्दाम आणलेली आहेत. आपणास ती पाहावयास हरकत नाही."

राजाने पहिल्या थाळीवरचा कपडा दूर केला, तेव्हा त्यात त्याला मातीचे ढेकूळ आढळले. ते मातीचे ढेकूळ पाहून राजाने म्हटले, "म्हणजे मी अगदी मातीच्या या तुकड्यासारखे असावे, असाच याचा अर्थ तर नाही?"

त्या थाळीच्या मालकाने खुलासा केला, "अगदी बरोबर, महाराज. जगातील सर्व गोष्टी मातीतून निर्माण होतात. झाडेझुडपे, लहान-मोठ्या सुंदर फुलांचे ताटवे मातीतून उगवतात व फळतात आणि फुलतात. दुसऱ्यांना समाधान देतात, सुख देतात. मातीतून सोने उगवते तसे हिरेदेखील पैदा होतात." या उत्तरावर राजा भोज प्रसन्न झाला. तो उद्‌गारला, "वा! छान! आपणास हे उत्तर एकदम पसंत आहे."

नंतर राजाने दुसरी थाळी उघडली. त्यात गुलाबाचे फूल होते.

गुलाबाच्या फुलाकडे खुशीची नजर टाकून राजाने म्हटले,

"याचा अर्थ मी गुलाबाच्या फुलासारखा सुंगधी आणि कोमल व्हावे, असा तर नाही?"

गुलाबाचे फूल थाळीतून आणणाऱ्या व्यक्तीने राजाकडे नम्रपणे निवेदन केले. तो म्हणाला, "होय महाराज, आपण या फुलासारखे कोमल, सुगंधी आणि सुंदर व्हावे. यात रूप आहे, रंग आहे आणि सुवासही आहे. राजाने असे गुलाबाच्या फुलासारखे व्हावे, असे मला वाटते."

"अरे वा! काय सुंदर विचार आहेत. मला तर हे विचार एकदम आवडले बुवा!"

त्यानंतर तिसरा थाळीवाला पुढे आला. राजाने त्याची थाळी उघडली. आश्चर्य दाखवीत तो म्हणाला, "अरेच्चा! हे तर सोने दिसतेय! मग मी काय सोन्यासारखे असावे काय? तेजस्वी आणि कठीण?"

"होय, महाराज,! तिसरा थाळीवाला बोलू लागला. तो म्हणाला, "सोने आपला रंग कधी बदलत नाही. त्याला गंज वगैरे चढत नाही. सुवर्णाचे अलंकार माणसाला अधिक सुंदरता प्राप्त करून देतात. म्हणूनच आपण सोन्यासारखे असावे, असेच मला वाटते."

या उत्तराने राजाला अधिक हर्ष झाला. तो म्हणाला, "वा! वा!! हे उत्तर मला खूपच पसंत पडले आहे." नंतर त्याने शेवटच्या थाळीकडे नजर वळविली. तिच्यावरील कपडा त्याने दूर केला आणि त्यात त्याला दिसली भेंडीची एक कोमेजलेली कळी व एक ताजी कळी. ते अजब दृश्य पाहून सारी सभा आश्चर्यचकित होऊन त्या थाळीकडे पाहू लागली.

"मी या भेंडीच्या फुलासारखे व्हावे काय? मला हे मुळीच पसंत नाही."

चौथ्या थाळीमध्ये भेंडीच्या कळया ठेवणारा होता खुद्द कविवर्य कालिदास. त्याने राजाला खुलासा करीत म्हटले, "महाराज, यातील अर्थ सहजासहजी समजणारा नाही, उत्तर कठीण आहे. जमीन सगळी सारखी असत नाही. गुलाबाचे फूल हळूहळू कोमेजून त्याची एक-एक पाकळी गळून जाईल आणि मग त्यातून आपण जिवंत तरी कसे काय राहणार? सोन्यामध्ये रूप आहे, पण ते कठोर आहे. सोन्याला घणाघात सोसावे तर लागतातच, पण पुष्कळ मारामारी, दुष्टावा, वैर, भांडणे आणि मरणही पाहण्याची वेळ येते. अशी वस्तू कोणाला पसंत पडेल? सारचे अशा सोन्याचा स्वीकार करतील का? पण मी दोन भेंडीच्या कळया आणल्या आहेत. एक शिळी झालेली आणि एक उमलती, टवटवीत,



कोमेजलेली कळी कोणी स्वीकारणार नाही, पण ताजी कळी सर्वच पसंत करतील."

राजाकडे व दरबारी मंडळींकडे पाहात कालिदासाने मग थोडा वेळ थांबून पुढे स्पष्टीकरण सांगण्यास सुरवात केली. "आपण नेहमी ताजे टवटवीत असायला हवे. कोमल पण असायला हवेच हवे. कोमलतेमध्ये नम्रता लपलेली आहेच. तसेच नाजुक-मृदू दिसणारी विवेक वृत्ती लक्षणीय आहे. तेव्हा आपण विनय





आणि विवेक यांसारखे असायला हवे. अर्थात् राजा हा तर विवेक आणि विनयाचा पुतळा दिसला पाहिजे. जगात अशा राजाची सतत वाहवा होईल."

कालिदासच्या उत्तराने सारेजण एकदम खूश झाले. राजा तर त्याची वाहवा करीत होता. त्याने कालिदासाच्या बुद्धिमत्तेची, चतुराईची स्तुती करून त्याला मोठे बक्षीसही दिले.





१९

# परीक्षा

मुलांनो, परीक्षा म्हटली की तुम्हाला भीतीच वाटत असते ना? कोणी म्हणेल, "त्या परीक्षेचा एक एवढा बाऊ करण्याचा विचार कशाला?" गोष्ट खरी आहे. परीक्षा काय शाळेत-महाविद्यालयातच असते? ती तर देवालासुद्धा चुकत नाही. एवढी महान आहे व व्यापक आहे. तेव्हा तिची सतत प्रयत्न, सतत



अभ्यास करून मनापासून पूजा केली की, परीक्षा खूश! मग ती तुम्हाला पासच करणार! आणि पास होऊन तुम्हाला खुशीचा आनंद मिळणार- त्यामुळे आजोबा-आजी, आई-बाबा, ताई-दादा, गुरुजी-मित्र खूशच खूश!

यासाठी मग येथे वेगळ्या परीक्षेची मी तुम्हाला गोष्ट सांगतो- तुम्हालाही ती माहीत असेल सुद्धा!

गोष्ट आहे- गौतम बुद्धाची आणि त्यांच्या शिष्याची.

गौतमबुद्ध हे बौद्ध धर्माचे थोर आचार्य! त्यांनी जगभर बौद्ध धर्माचा प्रसार व्हावा म्हणून प्रचाराचे मोठे कार्य केले. एकदा त्यांना, एक शिष्य समोर येऊन नमस्कार करून उभा राहिला. त्याला धर्मप्रचारासाठी बाहेर जावयाचे होते. बुद्ध त्याला आशीर्वाद देत म्हणाले, "वत्सा, तुझे कल्याण असो. आयुष्यमान् भव!"

बुद्धदेवांनी मग मनाशी विचार केला, आपल्या या बाहेर निघालेल्या शिष्यामध्ये विचारांची, विवेकाची व सहनशीलतेची किती तयारी आहे? तो बाहेर जातोच आहे. त्याची थोडी परीक्षा घेऊ या तर खरी? त्यांनी त्याला विचारले, "तुला बाहेर



गेल्यावर वाटेत कुणी जर मार दिला तर?" त्यावर तो शिष्य बुद्धदेवांना नम्रपणे उत्तर देता झाला, "महात्मन्, वाटेत मला कुणी मार दिला तर हरकत नाही. ते काही माझे हातपाय तर तोडून टाकणार नाहीत ना?"


"आणि समज, तुझे कोणी हात-पाय तोडले तर?"

"तरीही काही हरकत नाही... माझा ते प्राण घेणार आहेत थोडेच?"

"समज, तुझे मग प्राणच त्यांनी घेऊन तुला नाहीसे करून टाकले तर?"


"चालेल! अवश्य घेऊ द्यात. माझा आत्मा तर ते नाही ना घेणार? आणि त्यात असणाऱ्या गुणांना तर ते धक्का लावणार नाहीत ना?"- शिष्यवराने उत्तर दिले आणि बुद्धदेवांना पुन्हा नमस्कार केला.

मनोमनी गौतम बुद्ध प्रसन्न झाले. त्यांनी त्यांना निरोप देता देता आज्ञा दिली, "जा जा! तू बाहेर जा. प्रचारकार्यात यशस्वी हो!"



# तडजोड

दरबार खच्चून भरला होता. सर्व मंत्री, सहकारी, आपापल्या स्थानावर विराजमान झाले होते आणि समोर सिंहासनही मोकळे नव्हते. त्यावर महाराज रणजितसिंह विराजमान झाले होते.






महाराज आपल्या सर्व मंत्री-सल्लागार सहकारी मंडळीबरोबर अनेक विषयांवर चर्चा करण्यात दंग होते. प्रश्नोत्तरे, तक्रारी-निकाल , कारभार-व्यवहार, विचार, राज्याची हालहवाल इत्यादी प्रश्न चर्चिले जात होते. एवढ्यात बाहेर कोणीतरी मोठमोठ्याने आक्रोश करीत असल्याचे दरबारी लोकांना जाणवू लागले. तो आरडाओरड, तो आक्रोश एकाएकी कसा आला, याचेच सर्वांना कुतूहल वाटले. महाराज रणजितसिंहही अस्वस्थ होऊन त्या गडबडीकडे लक्ष देऊ लागले. त्यांनी हुकूम केला, 'जो कोणी आता आरडाओरड करून या दरबारच्या शांततेला गालबोट लावीत आहे, त्याला ताबडतोब येथे दरबारात माझेसमोर हजर करा!'

महाराजांचा हुकुम तत्काळ अमलात आणण्यासाठी दरबारी सेवक धावले. आणि त्यांनी एका युवकाला महाराज रणजितसिंहासमोर आणून उभे केले.

"काय झालेय ओरडायला तुला, युवका? तुला असा एकाएकी दरबारच्या आवारात आक्रोश चालविण्याचे कारण काय?"

"महाराज, आपण आमच्या यातनांची व कष्टाची कशी काय कल्पना करू शकता?" युवक सांगू लागला. त्याचे अंगावर फाटके, तुटके, मळके असे अर्धवट कपडे होते. तो अगदी काळंवडलेल्या चेहऱ्याचा दिसत होता. हातपाय धुळीने माखले होते. डोळयांत तेज होते पण दारिद्र्य, दुःखाने भरलेल्या अश्रूतही त्याच्या डोळयांत एक विलक्षण झाक होती. धाडसही प्रत्ययाला येत होते. तो अठरा वीस वर्षांचा असेल नसेल, पण अत्यंत दुःखी होता.



पुढे तो म्हणाला, "महाराज, ईश्वर किती पक्षपाती आहे. तुम्हाला एवढे ऐश्वर्य दिले आणि आमच्या पदरी ही दशा! तुम्हाला धनदौलत, रहायला भव्य अशा महालासारखे निवासस्थान, अंगावर उंची वस्त्रे-आभूषणे, दिमतीला दरबारी मानकरी, हुजरे,



सेवक, खाणे-पिणे. सारे ऐश्वर्य ईश्वराने तुमच्यासमोर उभे केले आणि मी हा असा! एकाला राजसिंहासनाचे सर्व काही भोग, ऐश्वर्य नि एकाला ही कलंदर दरिद्री अवस्था? काय हा ईश्वराचा न्याय म्हणावा की-?"

त्या युवकाचे आवेशयुक्त भाषण ऐकून महाराज रणजितसिंह क्षणभर तटस्थ होऊन गेले. ते विचार करून त्या युवकाला म्हणाले,

"तुझ्यावर खरोखर ईश्वराने अन्याय केला आहे असे वाटते का?"

"होय! ईश्वराने असा पक्षपात जो माझ्याबाबत केलाय व जो मोठा अन्याय केलाय, त्याची आपणास कशी काय कल्पना येणार, महाराज? तुम्हाला मी कसे समजावून देऊ?" युवक धाडसी नजरेने महाराजांकडे पाहत बोलत होता. महाराज ऐकत होते.

ते एकदम त्या युवकावर नजर रोखीत म्हणाले, "हे पहा! तुझ्यावर तू म्हणतोस तसा देवाने जो मोठा अन्याय केला आहे, पक्षपात केला आहे, तो मीच दूर करतो. हे राजसिंहासन, हा महाल – हे सारे मी तुझ्या स्वाधीन करतो. तू आताच या गादीवर बैस. मी तुला तिचा हक्कदार करीत आहे."

सारा दरबार महाराजांच्या या भाषणाने आश्चर्यचकित होऊन त्यांचेकडे पाहू लागला. दरबारात एकदम विलक्षण वातावरण निर्माण झाले. महाराज असे का सांगत आहेत याचा बोध एकाही मंत्र्याला किंवा सेवकाला होईना. तो तरुणही महाराजांच्या भाषणाने गडबडून गेला.

पुन्हा एकदा महाराज रणजितसिंह निश्चयी सुरात त्या तरुणाकडे पाहत म्हणाले, "तुझा या माझ्या शब्दावर विश्वास

बसत नाही? मी अगदी स्पष्ट व सत्य तेच सांगतो आहे. मी माझा राज्यकारभार आणि हे सर्व वैभव तुला देत आहे. तू आता या सिंहासनाचा खरा मालक आहेस! पण हो! एक छोटीशीच वस्तू तुझ्याजवळ आहे ती फक्त तू मला या बदल्यात देऊन टाक!"

"कोणती एकमेव वस्तू, महाराज?" युवक अस्वस्थ होऊन महाराजांना विचारू लागला.

"सांगा सांगा महाराज? कोणती अशी एक वस्तू माझ्याकडे आहे आणि ती मी तुम्हाला देऊ शकेन?"

"मी काणा आहे! ईश्वराने मला एकच डोळा दिला आहे. आणि तुला दिले आहेत दोन! तू तुझा एक डोळा मला दे आणि त्या बदल्यामध्ये या गादीचा तू मालक हो!"

"ही गोष्ट कशी शक्य आहे, महाराज?" तो तरुण घाबराघुबरा होऊन विचारता झाला.


"का नाही शक्य? ताबडतोब तू तुझा एक डोळा मला दे आणि या राजसिंहासनाचा धनी हो- त्याच्या बदल्यात! तुला सौदा पसंत नाही का हा?"

"नाही नाही! मी या सिंहासनावर बसणार नाही. मला नको हे ऐश्वर्य, नको ही गादी - नको तो तुमचा खजिना - नको तो महाल- मला हे सारे काही मुळीच नको-"

"सारी धनदौलत, सोने, जडजवाहीर, चांदी-हिरे-रत्ने घे- मी तुला देतो आहे.- पण तुझा एकच डोळा मला देऊन टाक." महाराज रणजितसिंह बोलत होते. त्या तरुणाला आग्रहाने सांगत होते.

"नाही ! मुळीच नाही. मला हा व्यवहार मान्य नाही. मला सौदा मंजूर नाही- महाराज! तुमचे हे सारे वैभव तुम्हीच सांभाळा. पण मी मात्र माझा एकही डोळा आपणास देऊ शकणार नाही."

तरुणाच्या निश्चयाकडे पाहत महाराज रणजितसिंह म्हणाले, "पहा! ईश्वराने तुला किती मौल्यवान अशी वस्तू दिली आहे. जिच्यापुढे सारे वैभव, सिंहासन व सारी धनदौलत, सुख आणि सत्ता काहीच नाही. ईश्वराने मला ह्या मौल्यवान वस्तूही पुरेशा दिलेल्या नाहीत. मग आता सांग, ईश्वराने पक्षपात कोणावर केलाय? अन्याय कोणावर केलाय? तुला देवाने दोन हात, दोन पाय, दोन डोळे आणि हे तगडे शरीर आणि बुद्धी दिली. तू त्याचा पुरेपूर उपयोग कर आणि पहा सारे माझ्यापेक्षा ही उदंड वैभव मिळून जाईल- एवढी अमूल्य देणगी ज्या ईश्वराने तुला दिली आहे त्याचे मनमोकळेपणाने आभारच मान!"



२९

# देव तारी त्याला...!

रवी आणि रेवती आईची वाट पाहत वाटेकडे डोळे लावून बसली होती आणि गणेश कुबड्यासह तात्या घरी येऊन पोचला तेव्हा त्यांना बरे वाटले. सुनीलला तर तात्या केव्हा येतो आणि मी ते परिपत्रक केव्हा दाखवतो असे होऊन गेले होते. कर्मधर्मसंयोगाने तात्या टेरवहून यायला आणि गोरबाही तितक्यात तिथे यायला एकच गाठ पडली.

प्रवासाची आणि गावाकडची ख्यालीखुशाली विचारून झाली. "कुबड्या, मामाला भेटला ना एकदा? आता आपले बालवाडीचे काम सुरू." गोरबांनी सूतोवाच केले. तेवढ्यात सुनीलही तेथे येऊन पोचला. गोरबाच्याच पुढ्यात त्याने परिपत्रक टाकले. "हे वाचा- हे वाचा. मग बोला!" आणि तो तिथेच उभा राहिला.

गोरबा खुलले. अन् बालवाडीच्या राजाभाऊंना म्हणाले, "कुबड्याला बघा नामी संधी आलीय. करू या तयार आणि देऊ या बार उडवून. १५ ऑगस्टच्या समारंभात कुबड्याचे कीर्तन असे रंगेल की काही विचारू नका. कळवा पत्राने त्या संयोजकांना का कोणाला ते!"

आणि सुनीलने लगेच सर्वांना विचारून कुबड्याच्या कीर्तनाचा विषय कळवून टाकला होता- 'यत्न तो देव जाणावा'

"चला, आता तयारीला लागा. दोन महिन्यांनी १५ ऑगस्ट रोजी अपंग मेळाव्यात कार्यक्रम करायचा." गोरबानं इशारा देत घरची वाट धरली.

दोन दिवसांत बालवाडीच्या शाळेकडे लक्ष द्यायला राजाभाऊंना वेळ झाला नाही. सुनीलने त्यांची योग्य भूमिका बजावली होती. पण राजाभाऊ सकाळी कार्यक्रम आटपून बालवाडीत निघाले. वर्ग भरण्यास अर्धा तास वेळ होता. त्यांनी कार्यालयात जाऊन पत्रव्यवहार पाहिला. इतर गोष्टींची तपासणी केली आणि बालमंदिराकडे त्यांनी पाय वळविले. गणेश



कुबड्या स्टुलावर बसून काहीतरी वाचीत होता. शिवाय त्याची बारीक नजर सर्वत्र भिरभिरत होतीच. तात्या आल्याचे त्याने पाहिले होते.

"गणेश, आता तुझी आठवी इयत्ता आहे. चांगला अभ्यास करायला हवा. सुनीलला विचारून अभ्यास कर. गणिते सोडव. बाकीच्या विषयातही दुर्लक्ष करू नको बरं का!" तात्याने कुबड्याला इशाऱ्याचे चार शब्द सुनावले. "गोरबा सांगतील. कीर्तनाचा विषय देऊन गेले आहेत. त्याच्याप्रमाणे तयारी कर."

त्यांनी मग हजेरीपत्रक पाहिले. मुले चाळीसपेक्षा अधिक नव्हती, पण दुसरीचा वर्ग समाधानकारक हजर नव्हता. रजनीताईंना त्याबद्दल सूचना दिली व तात्याची स्वारी नोकरीच्या दिशेने निघून गेली. सकाळचे दहा वाजून गेले. बालवाडीची आता वेळ भरली होती. कुबड्याने पितळी वाजवून शाळा सुटल्याची वर्दी दिली.



कुबड्याने हजेरी पुस्तक आत नेऊन ठेवले, पितळीची जागा होती तिथे ती नेऊन ठेवली. शाळा बंद करून तो घरी जायला निघाला. रजनीताई कार्यालयातच बसल्या होत्या. काही पत्रे वाचून ती निकालात काढायला झाली होती. बालवाडीचे काम संपवून घरी आल्यावर ताईंनी मालकांची चौकशी केली. ते कामावर गेले होते. मुले शाळेत गेली होती. घरी होता फक्त त्यांच्यापुढे आलेला कुबड्या गणेश. तो आंघोळीची व्यवस्था करण्यात गुंतला होता. त्याचे कपडे अगदी जुने झालेले दिसत होते. नवीन कपड्याबाबतीत काहीतरी विचार करायला हवाच. आपल्याही रवी आणि रेवती यांना या वर्षी कपडे केलेच होते कुठे? तिच्या मनात एक प्रकारे या प्रश्नाने काहूर उठवले.

तोच 'आई- आई- मेलो- मेलो'- कुबड्याने करुण स्वरात केलेली ओरड ऐकू आली. रजनीताईने घाबरतच त्याचेकडे धाव घेतली. पाहते तो काय? कुबड्या जमिनीवर लोळत पडला होता. त्याला वेदना असह्य होत होत्या. त्याचे हातपाय गार पडत असल्याचे तिच्या लक्षात आले. तिने हळूच उचलून त्याला बाजूला ठेवले. पाहते तो न्हाणीघराजवळ एक लांब साप अर्धवट जळलेला दिसला. तिची तर ते पाहून बोबडीच वळली. तेवढ्यात सखाराम कुठून तरी तेथे अचानक आला. कुबड्याला बहुधा सापाने दंश केला असला पाहिजे याची त्याला खात्री वाटली. त्याने त्याचे हातपाय पाहिले. पायाच्या घोट्यातून रक्त वाहात होते. सखारामने क्षणाचाही विलंब न करता त्याचा तो पाय घोट्याचे वर करकचून दोरीने बांधून टाकला. कुबड्याला जरा ग्लानी आली होती. त्याने जवळच असलेल्या एका पोराला पिटाळून डॉक्टरला आणायला



पाठविले. रजनीताईंनी तर रडून आकांत मांडला. तिचे सांत्वन तिची मुलेच करीत होती.

तेवढ्यात डॉक्टर आले. त्यांनी कुबड्याला तपासले. नाडी पाहिली. ती नीट चालू होती. रक्तप्रवाहाचे निरीक्षण करून त्याला एक इंजेक्शन दिले. त्यामुळे विषबाधा झाली तरी ती सौम्य होईल व धोका वाढणार नाही असे स्पष्ट केले. तेवढ्यात राजाभाऊने कुठूनतरी एक रिक्षा आणली व तो सखारामला घेऊन कुबड्यासह दवाखान्याकडे रवाना झाला.

राजाभाऊंनी कुबड्याला मांडीवर घेतले होते. कुबड्या निपचित अवस्थेत होता. रिक्षा भरधाव चालली होती. एवढ्यात मागून एक जीप आली. सरपंचांनी रिक्षातील पॅसेंजरकडे पाहिले व रिक्षावाल्यास थांबवले. ते खाली उतरत राजाभाऊंना म्हणाले, “हे काय गुरुजी? मला हाक न मारता पोराला चालवलंय? मी तर समजल्याबरोबर हा तुमच्या मागे धावतो आहे. चला, बसा. कुबडेबुवांना घ्या अलगद.” असे म्हणत रिक्षावाल्याचे भाडे त्यांनीच चुकते केले आणि ते हॉस्पिटलच्या आवारात शिरले. डॉ. बने व्हरांड्यातच पेशंटबरोबर उभे होते. बिबवेवाडीच्या सरपंचांनी कोणीतरी पेशंट आणलेला त्यांनी पाहिले. ते तडक जीपजवळ आले. त्यांनी नर्सला बोलावून स्ट्रेचरवरून पेशंटला आत घ्यायला सांगितले आणि ते सरपंचाबरोबर बोलत होते. राजाभाऊंनी त्यांना पेशंटची माहिती दिली.

डॉक्टर आत गेले, त्याला त्यांनी तपासले- नर्सने प्राथमिक उपचार केले होते, ती डॉक्टरकडे येत स्मित करीत म्हणाली, “डॉक्टर, पेशंट इज ओके! तो सुधारतोय, सर!” डॉक्टरनी तिच्याकडे काही लक्ष दिले नाही. कुबड्याची किंमत ते समजून

चुकले होते. त्यांना कुबड्याबद्दल सर्व समजले होते. त्यांनी पुन्हा नाडी पाहिली. तो सावध होत होता. विष उतरून गेले होते. फक्त त्याला अशक्तपणा राहिला होता. त्यांनी औषध लिहून दिले व कुबड्याला डिसचार्ज देण्याचा निर्णय घेतला. सरपंच आणि राजाभाऊ घरी जाण्याच्या तयारीला लागले.

शेवटी या साऱ्या उपचाराचा खर्च? त्याशिवाय सुटका नव्हती. सरपंचांनीच डॉक्टरना विचारले. "डॉक्टरसाहेब, एवढ्या झट की पट हालचाल झाली. आम्ही केली. तुम्हीही आपलेपणाने एका अपंगाला, नव्हे, मोलाच्या माणसाला तर जीवदान दिलेत. तुमचे उपकार किती मानावे तेवढे थोडेच. आता बिलाचे बोला." असे म्हणत त्यांनी खिशात हात घातला. राजाभाऊ सरपंचांना मागे सारून पुढे झाला, "सरपंच, पेशंट माझा आहे.-" डॉक्टर दोघांनाही विरोध करून म्हणाले, "हे बघा, कुबड्याला चावायला निघालेला साप जहरी असता तर हा मुलगा येथे येण्याचे आतच गेला असता. शिवाय तुम्ही गावच्या डॉक्टरकडून एक इंजेक्शन दिले होते. - साप तेवढा विषारी नव्हता आणि आमचे उपचारही त्याचे जरी प्राण वाचवून गेले तरी ईश्वरी शक्तीच त्याला तारू शकते हे विसरता येत नाही. मी याबद्दल कवडीही घेणार नाही. एका ग्रामीण अपंगाला मी वाचविले त्यातच मला सारे पावले."


सरपंचांनी आणि राजाभाऊंनी डोळ्यांत पाणी आणून डॉक्टरना नमस्कार केला. कुबड्याने तर त्यांचे पायच धरले.

कुबड्या सहीसलामत बालवाडीत परत आला. बिबवेवाडीचा आनंद विचारू नका. रजनीताईंनी तर त्याला पाहून आनंदाने ईश्वराचे आभार मानले. ती म्हणाली, "देव तारी त्याला कोण मारी!"

# विनोबांची शिवजयंती



विनोबा यांचे पूर्ण नाव- विनायक नरहर भावे. त्यांचा जन्म रायगड जिल्ह्यात (कुलाबा) गागोदे येथे सन १८९४ साली ११ सप्टेंबर रोजी झाला. आणि बरेचसे शिक्षण बडोदे येथे झाले. त्यांना अनेक भाषा येत. मराठी, संस्कृत, हिन्दी, ऊर्दू, फारशी इ. भाषा त्यांना अवगत होत्या. पण गीतेवर त्यांचे प्रेम फार होते. आईच्या आग्रहाने त्यांनी गीतेचे सुलभ भाषांतर 'गीताई' या छोट्या पण कीर्तीने मोठ्या पुस्तकात केले आहे. त्यांनी 'मधुकर' आणि 'गीता-प्रवचन' इ. ग्रंथसंपदा जी लोकमानसांत ठसविली ती अपूर्व आहे. महात्माजी त्यांना आपला मानसपुत्र म्हणत. त्यांच्या आंदोलनाच्या कार्यात 'पहिला सत्याग्रही' म्हणून विनोबाजींचे नाव गौरविले होते.





भारताच्या स्वातंत्र्य-सत्याग्रह चळवळीतील एक थोर कार्यकर्ते तसेच भू-दान चळवळीचे ते एक मोठे निर्माते- 'सबभूमि गोपाल की' या उक्तीचा जन्म विनोबावाणीतून झाला. आधुनिक भारताचा आधुनिक संत म्हणून त्यांचे नाव पुढे आहे. मराठी साहित्यात विनोबा-वाङ्मय आगळे शोभून दिसणारे आहे. त्यांची देशभक्ती विलक्षण होती.

श्री शिवछत्रपतींचे ते श्रेष्ठ भक्त होते. त्यांनी या महाराष्ट्राच्याच नव्हे तर, भारतीय श्रेष्ठ युगपुरुषाची जयंती जरा वेगळ्या पद्धतीने जी साजरी केली, ती वाचण्यासारखी आहे. विनोबांनी त्या वेळी, म्हणजे आपल्या बालपणी सवंगड्यांसह एकदा शिवजयंती जी साजरी केली आणि रानात जाऊन! त्याची हकीकत अशी-

विनोबा शाळेत जात असताना एकदा शिवछत्रपती श्री शिवाजी महाराजांची जन्मतिथी आली. त्या दिवशी तशी शाळेला सुट्टी नव्हती. वर्गातील इतिहासाच्या तासाला रजा देऊन सवंगड्यांना घेऊन ते रानात निघाले. वाटेत आपल्या सोबत्यांना म्हणाले, "मित्रांनो, आपण आज शिवजयंती साजरी करू या." डोंगराच्या अध्यक्षतेखाली आकाशाच्या मोकळ्या छताखाली. सारेजण निघाले आणि रानात त्यांनी शिवजयंतीचा कार्यक्रम पार पाडला.

"पण आपण आज शाळेत न गेल्याबद्दल व इतिहासाच्या तासाला बुट्टी मारल्याबद्दल दंड होईल, त्याचे काय करायचे?" मित्रांनी त्यांना प्रश्न केला. त्यावर विनायक भावे म्हणाला,"चार चार आणे घेऊन जाऊ. दंड द्या म्हणताच मास्तरांच्या पुढ्यात ते फेकून देऊ म्हणजे झाले."

त्यांना दुसऱ्या दिवशी शाळेत गेल्यावर रागावून शिक्षकांनी "काल शाळा चुकवून कुठे गेला होता तुम्ही?" असा प्रश्न विचारला.

"शिवजयंती साजरी करायला!"

"फाजील आहात. तुम्हाला दंड करायला हवा."

शिक्षकांच्या तोंडून दंडाची भाषा उच्चारताच,"हा घ्या दंड." असें म्हणून मुलांनी भराभर त्यांचेसमोर चार चार आणे ठेवून दिले. ते त्यांचे विलक्षण साहस पाहून शिक्षकांना मोठा अचंबा वाटला. ते त्या सर्व मुलांकडे पाहतच राहिले. अशी साहसी मुले त्यांच्या शिक्षकी पेशात प्रथम दिसली असावीत.

विनोबा भावे यांनी आपल्या बालवयात, वेगळ्या तऱ्हेने शिवाजी महाराजांची जयंती सवंगड्यांसह वनात जाऊन साजरी केली. विनोबाजींनी त्यांचे थोरपण तेव्हाच ओळखले होते.

असे हे दोन युगपुरुष! त्यांना कोटी कोटी प्रणाम!



# अजब अंगरखा

एक होता राजा. त्याला मूलबाळ काही नव्हते. त्याने खूप नवस केले. आणि ते यशाला आले. राणीला एक सुरेख मुलगा झाला. राजाच्या आनंदाला तर पारावार उरला नाही. राजवाड्यात आनंदी आनंद झाला. नगरात लोक खूष झाले. राजाच्या हुकुमाची वाट न पाहता त्यांनी आनंदोत्सव सुरू केला.

राजाच्या मुलाला कपडे, खेळणी आणि प्रत्येकाने आपापल्या ऐपतीप्रमाणे अनेक भेट-वस्तू दिल्या. तो राजपुत्र सर्वांचा लाडका झाला. राजा-राणी तर त्याला कुठे ठेवू, कुठे नको असे करीत. नोकर-चाकर, दास-दासी राजपुत्राच्याकडे मोठ्या कौतुकाने पाहत, त्याचे कोडकौतुक करीत.

पुढे जसजसा राजपुत्र वाढू लागला तसतशा त्याच्या बाललीलांना खोडसाळपणाचे रूप येऊ लागले. त्याचबरोबर एक प्रकारे सर्वांना त्रास होऊ लागला. दिवसेंदिवस त्याच्या वागण्यात, त्याच्या बोलण्या-चालण्यातील गोष्टींनी विचित्र-तऱ्हेवाईकपणा दिसू लागला. राजकुमार हळूहळू बिघडत चालला होता. पण त्याच्याबाबत कुणाला काही बोलता येत नव्हते. राजाच्या कानावर राजकुमाराचे खोडकर तापदायक चाळे घालण्यास कोणी पुढे येण्यास राजी होत नसे. उगाच राजाचा रोष कोणी ओढवून घेण्याचे धाडस करीत नव्हते. राजकुमाराचे वाढते चाळे तर वाढतच होते. सर्व नागरिक आणि राजवाड्यातील मंडळीही वैतागून जात होती.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राजकुमाराच्या वाढदिवसाची तारीख जवळ येत होती. त्याच्या वाढदिवसाची तयारी मोठ्या

धडाक्याने राजवाड्यात, खास पद्धतीने सुरू झाली. राजपुत्रालाही वयोमानाने वाढत्या गुणांचा व मित्रमंडळीचा लाभ झाल्यामुळे तो थोडा उद्धट बनला होता. बिघडलेल्या या राजकुलभूषणाने सारी मंडळी जेरीस आणली होती.

त्या दिवशी वाढदिवसानिमित्त भरलेला खास दरबार संपला. मानकरी, मित्र-मैत्रिणी व इतर मान्यवर नगरवासी लोक राजकुमाराचे पुन्हा एकदा अभिनंदन करून हळूहळू बाहेर पडून जात होते. मंत्री-प्रधान आणखी राजा-राणी सर्वांना निरोप देत होती. राजकुमार आपल्या तोऱ्यात होता. एवढ्यात एक वृद्ध साधू तिथे आला होता. त्याने राजपुत्राला एक अंगरखा भेट म्हणून दिला आणि शुभाशीर्वाद दिले. त्याचे अभिनंदनही केले. त्याने तो दिलेला अंगरखा मोठा ढगळ असा होता. त्या साधुमहाराजांनी राजाला व राजकुमारला त्या अंगरख्याची नीट माहिती दिली. तो म्हणाला, "हा अघळ- पघळ अंगरखा एक अजब वस्तू आहे. ही अजब वस्तू मी स्वर्गातून खास युवराजांसाठी आणली आहे. या अशा अंगरख्यामध्ये विशेष गुण आहेत."

साधुमहाराजाचे सारे ऐकून घेण्यापूर्वीच तो अंगरखा राजकुमाराने धसमुसळेपणा करीत अंगात घातला सुद्धा! पण काय नवल... तो साधुमहाराजाने दिलेला अजब अंगरखा राजपुत्राच्या अंगात अगदी चांगला उतरला. पण तो राजपुत्राच्या चारित्र्य-गुणांमुळे मळकट दिसू लागला. त्याच्या त्या अंगरख्याकडे पाहून लोक हसूच लागले. राजकुमाराची टवाळी करू लागले.

त्यामुळे तो वैतागून गेला. राजाही थोडासा नाराज दिसू लागला. राणीला तर त्या अंगरख्याची भीतीच वाटू लागली होती. त्या साधूने अंगरख्याची माहिती दिल्यावर सांगितले होते की,"हा



अंगरखा ज्याच्या अंगावर राहील तेव्हा त्या माणसाच्या चरित्र-गुणांप्रमाणे त्याचा रंग बदलत राहील."

राजाने यावर काळजीने साधुमहाराजांना त्यावर उपाय काय तो सांगावा, अशी विनंती केली. ते साधुमहाराज सांगू लागले, "यावर एक उपाय आहे. तो म्हणजे स्वभावात बदल करण्याची जर राजकुमारांनी तयारी केली, तर त्यांची या त्रासातून सुटका होईल."

राजपुत्रासमोर मोठा प्रश्न उभा राहिला. त्याची तर मोठी परीक्षाच होती. आणि त्यातून बाहेर पडल्याशिवाय काही दुसरा इलाज नव्हता. त्याने आपला स्वभाव, आपले वागणे-बोलणे सुधारण्याचा प्रयत्न केल्याखेरीज दुसरी वाट त्यातून दिसत नव्हती. राजकुमाराने हळूहळू यात सुधारण्याचा मार्ग लक्षात घेऊन,



गरीब-दुबळ्यांची दुःखे दूर करीत त्यांची सेवा करण्याचे ठरविले! हळूहळू सवयी बदलत होत्या. त्यामुळे त्याचे परिवर्तन जे होत होते ते सर्वांनाच सुखकर वाटू लागले. बाहेरचे लोक आणि राजवाड्यातील सारी नोकर-चाकर मंडळी मनापासून खुशीत आल्यासारखी दिसू लागली. आणि एक दिवस असा उजाडला की, राजकुमार पूर्वीपेक्षा खूप बदललेला असा सर्वांस दिसू लागला. त्या अजब अंगरख्यापासून अखेर सुटका होऊन तो मुक्त झाला. प्रजाजनांनाही खूप समाधान झाले. राजा-राणी देखील आनंदित झाली.

